**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९**
**दर्जेदार शिक्षणासाठी शाळा बाहय प्रयोजनासाठी काम करणाऱ्या शिक्षकांच्या सेवा नियुक्तीच्या मुळ शाळेत वर्ग करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः आरटीई २०१३/प्र.क्र.१३२/प्राशि-१

मंत्रालय, विस्तारभवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २२ मे, २०१३

**संदर्भ :-**

(i) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चे कलम २७.
(ii) शासन परिपत्रक क्र. आरटीई २०१३/प्र.क्र.१३२/प्राशि-१, दिनांक ३ मे, २०१३.

**शासन परिपत्रक -**

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

२. केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेत २००२ साली दुरुस्ती करुन, ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ली ते ८ वी) मिळण्याचा मूलभूत अधिकार प्रदान केला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** पारित केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून राज्यात सुरु आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी हा कायदा वैध ठरविला आहे.

३. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** यातील तरतूदी लागू होवूनही राज्यातील अनेक प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या सेवा जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती, तहसील कार्यालय, महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी कार्यालयात प्रतिनियुक्तीने किंवा तात्पुरत्या स्वरूपात वर्ग केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे अनेक शाळांमध्ये पुरेसे शिक्षक उपलब्ध नसून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. या बाबीस आळा घालण्यासाठी अशा प्रकारे तात्पुरत्या स्वरूपात सेवा वर्ग होवून शाळा बाहय कामे करणाऱ्या

शिक्षकांना पुनश्च: मूळ शाळेवर नियुक्त करण्याची मागणी येत असून याबाबत विधीमंडळामध्ये सुध्दा चर्चा झालेली आहे. अधिनियम, २००९ चे परिशिष्टानुसार कनिष्ठ प्राथमिक(इयत्ता १ ते ५) व वरिष्ठ प्राथमिक(इयत्ता ६ ते ८) या वर्गांसाठी अनुक्रमे २०० व २२० इतक्या दिवशी अध्यापन होणे बंधनकारक आहे.

४. या परिस्थितीत सार्वत्रिक निवडणूकीची मतदान प्रक्रीया (प्रशिक्षण, मतदान व मतमोजनी यासाठी आवश्यक कालावधी )वगळता इतर कोणत्याही प्रयोजनार्थ राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी संस्थेव्दारे संचलित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या सेवा वापरण्यात येवू नयेत अशा सूचना शासनाच्या समक्रमांकाच्या दिनांक ३ मे, २०१३ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. या सूचनांमुळे क्षेत्रिय स्तरावर संभ्रम निर्माण झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे दिनांक ३ मे, २०१३ चे शासन परिपत्रक रदद करून खालील सुधरित सूचना देण्यात येत आहेत.

(अ) **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ चे कलम २७** नुसार खालील तरतूद आहे.

No teacher shall be deployed for any non educational purposes other than the decennial population census, disaster relief duties or duties relating to elections to the local authority or the State Legislatures or Parliament, as the case may be.

उपरोक्त तरतूद पहाता दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण कार्य व स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभा निवडणूक प्रक्रियेशी निगडीत सर्व कामे शिक्षकांना करणे बंधनकारक आहे. इतर शाळाबाहय प्रयोजनार्थ शिक्षकांच्या सेवा देण्यास प्रतिबंध आहे.

या अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येत आहे की, सार्वत्रिक निवडणूकीशी संबंधित केवळ मतदान प्रक्रियेचीच कामे नव्हेत तर सार्वत्रिक निवडणूकीच्या संदर्भातील सर्व कामे उदा. मतदार यादी पुन:रिक्षण व छायाचित्र ओळखपत्र तयार करणे इत्यादी बंधनकारक राहील.

(ब) उपरोक्त प्रयोजने वगळता इतर कोणत्याही प्रयोजनार्थ इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीने किंवा तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या सेवा तात्काळ त्यांच्या मूळ नियुक्तीच्या शाळेवर वर्ग करण्यात याव्यात.

(क) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये दिनांक १ जून, २०१३ नंतर कोणत्याही शिक्षकाच्या सेवा अधिनियम, २००९ चे कलम २७ खाली येणारी प्रयोजने वगळता इतर प्रयोजनार्थ वापरल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी अथवा प्रशासन अधिकारी यांचेविरूध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हा परिषद, आयुक्त महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद तसेच शालेय शिक्षण विभागाच्या सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी उपरोक्त सूचनांचे पालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५२३१५३९२४५६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.05.23 15:50:58 +05'30'

**(ना.उ.रौराळे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण),
३. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण)
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
५. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
६. सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, शासकीय परिवहन सेवाकेंद्राजवळ, वरळी पोलिस कॅम्प, वरळी, मुंबई - २५
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
१४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. शिक्षण संचालक(प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
१९. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे,
२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
२१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
२२. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद,
२३. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद,
२४. सर्व प्रशासन अधिकारी, नगर परिषद/ कटक मंडळे,
२५. शिक्षण निरीक्षक (पश्चिम/ दक्षिण/ उत्तर), बृहन्मुंबई
२६. निवड नस्ती (प्राशि-१ कार्यासन)